संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# वाहनधारकांवर सक्तीचे वरवंटे

सध्या राज्यात वाहनांच्या नव्या नंबर प्लेटबाबत बराच संभ्रम निर्माण झालेला आहे. अतिसुरक्षिततेच्या नावाखाली सर्व वाहनचालकांना नंबर प्लेट बदलायला सांगितली गेली आहे. परंतु या प्लेटबदलासाठी येणारा खर्च वाहन चालकाच्या माथी लादून सरकारकडून पैसे कमाईच होत असल्याची जोरदार टीका होत आहे. हाय सिक्युरिटी प्लेट असे म्हणण्याचे कारण म्हणजे यासंदर्भात तयार करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमधून त्या वाहनाविषयी आणि वाहनचालकाविषयी बरीच माहिती एका क्लिकवर उपलब्ध होऊ शकेल. एवढेच नव्हे तर या वाहनाचा ठावठिकाणा काही सेकंदातच मिळू शकेल. यामध्ये वेगवेगळी तंत्रप्रणाली बसवली गेली आहे. नंबर प्लेटवरूनच जीपीएसही ॲक्टिव्हेट होतो आणि संबंधित वाहन कुठल्या रस्त्यावरून धावते आहे याचादेखील मागमूस काढता येतो. थोडक्यात सांगायचे तर कोणतीही नियमबाह्य कृती वाहन चालकांकडून घडली तर त्याच्यामागे पोलीस चक्र वेगाने धावू शकेल. कोणत्याही परिस्थितीत वाहन चालक पोलिसांना किंवा सुरक्षा यंत्रणांना गुंगारा देऊ शकणार नाही. जगातल्या अनेक देशांमध्ये अशा प्रकारच्या नंबर प्लेट वापरल्या जातात आणि आजच्या वेगवान तंत्रज्ञानाच्या युगात कोणत्याही प्रकारची सुरक्षितता वेठीला धरणाऱ्यांना तितक्याच वेगाने शोधून काढणे सोपे झाले आहे. व्यापक अर्थाने किंवा एकूणच राष्ट्रीय सुरक्षिततेच्यादृष्टीने विचार केला तर अशा नवनवीन सुविधांचा उपयोग करणे केव्हाही योग्यच ठरते. यातून वाहन चालक आणि सुरक्षा यंत्रणा या दोघांनाही हा प्रकार लाभदायक ठरतो. प्रश्न एवढाच निर्माण होतो की, आपल्याकडे अशा महत्त्वाच्या गोष्टींची अंमलबजावणी करताना त्याचे नियोजन होत नाही किंवा सुरक्षिततेचा मुद्दा पुढे करून सामान्य जनतेला वेठीला धरण्याचाही प्रकार घडतो. हायसिक्युरिटी नंबर प्लेटच्याबाबतीत काहीसा असाच प्रकार होतो आहे. या सुविधेची उपयुक्तता जनसामान्यांना किंवा वाहन चालकांना नीट पटवून दिली गेलेली नाही. आणि जर सुरक्षिततेच्यादृष्टीने इतकी महत्त्वाची ही बाब असेल तर सरकारने याबाबतचा आर्थिक भार लोकांवर टाकण्याची गरज नाही.

### सरकारने निम्मा खर्च करायला हवा

लोकांना सरकार ज्या गोष्टीची अंमलबजावणी करते आहे त्याबद्दल आक्षेप नाही. परंतु यासाठी अंमलात आणणाऱ्या कार्यपद्धतीला आक्षेप आहे. त्यातला पहिला आक्षेप म्हणजे अत्यंत कमी वेळात ही प्लेट बदलण्याचे बंधन घातले गेले आहे. प्लेट बदलली गेली नाही तर थेट दहा-दहा पंधरा-पंधरा हजारांचा दंड ठोठावण्याची धमकी दिली जाते आहे. म्हणजेच सर्व वाहन चालकांनी त्याची स्वयंस्फूर्तीने अंमलबजावणी करावी किंवा ही बाब एकूणच राष्ट्रीय सुरक्षिततेच्यादृष्टीने महत्त्वाची आहे आणि त्यात सर्वांचे हित पाहिले गेले आहे हे पटवून देण्यात सरकारी यंत्रणांना यश आलेले नाही. लोकांचा दुसरा महत्त्वाचा आक्षेप म्हणजे ही प्लेट बदलण्यासाठी विशिष्ट संगणक तंत्र वापरले जाते. पण त्यासाठीसुद्धा प्रत्येक वाहन चालकाकडून सरासरी साडेचारशे ते आठशे रुपये वसूल केले जाणार आहेत. मग त्यात दुचाकी ते चारचाकी वाहनांपर्यंत वेगवेगळे दर आकारले जात आहेत. साधारणपणे ज्या ज्या ठिकाणी सुरक्षिततेचा प्रश्न येतो त्या त्या ठिकाणी गोपनियता महत्त्वाची असते. त्याची जबाबदारी सरकारी यंत्रणांवरच येऊन पडते. अशावेळी या नंबर प्लेट बदलण्याचा सगळा भूर्दंड वाहन चालकांवर लादण्यापेक्षा त्याचा निम्मा खर्च सरकारने सोसणे गरजेचे होते. ज्या ज्या ठिकाणी सुरक्षिततेचा प्रश्न येतो किंवा त्यासंदर्भात अंमलबजावणी करण्याचा प्रश्न येतो. त्यावेळी त्याचा खर्च सरकारकडूनच केला जातो. अगदी देशाचे संरक्षण करणाऱ्या तीनही दलांचा खर्च सरकारी तिजोरीतून होतो. अगदी पोलिसांनादेखील गणवेश देताना त्याच्या खर्चाबाबतही अशीच तरतूद केली जाते. या गोष्टींची हायसिक्युरिटी नंबर प्लेटसंदर्भात तुलना करणे अनेकांना चुकीचे वाटेल. परंतु सुरक्षितता हा संवेदनशील मुद्दा लक्षात घेतला आणि सरकारकडून अनेक बाबतीत केल्या जाणाऱ्या खर्चाचे प्रमाण लक्षात घेतले तर या सुरक्षिततेशी संबंधित नंबर प्लेट बदलण्याच्या खर्चात सरकारने थोडा हिस्सा उचलायला हरकत नव्हती. आज वाहनधारकांना सर्वच प्रकारचा खर्च करावा लागत असतो. हे वाहनधारक केवळ स्वतःच्या मौजेखातर वाहने चालवत नसतात किंवा प्रत्येकाकडे बख्खळ पैसा आहे आणि आपली हौस भागवण्यासाठी सगळेच लोक वाहन खरेदी करीत नाहीत. यातली जवळपास सत्तर टक्के जनता ही आपल्या दैनंदिन गरजेपोटी खासगी वाहनांचा वापर करते हे लक्षात घेतले पाहिजे.

### सार्वजनिक परिवहनचे तीन तेरा

आज महाराष्ट्राच्या कोणत्याही महानगरात सरकारी परिवहन व्यवस्थेचा पूर्ण बोजवारा उडालेला आहे. प्रत्येकालाच मुंबईसारख्या महानगरात लोकलने किंवा रिक्षा-टॅक्सीचा भार सहन करून कामावर जाता येत नाही. पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक या ठिकाणच्या लोकांना घरापासून आपल्या कामावर जाण्यासाठी वेळेची आणि खर्चाची बचत करणाऱ्या दुचाकी वाहनासारखा दुसरा पर्याय नाही. काहीवेळेला तर कामाचे स्वरूप असे असते की, कामाच्या ठिकाणापर्यंत जाण्याकरीता रेल्वे, बस टॅक्सी यापेक्षाही कर्ज काढून चार चाकी वाहन घेणेसुद्धा लोकांना परवडते. यासाठी सर्व प्रकारचे दंड, भूर्दंड सोसायला लोक तयार असतात. आज सगळ्या प्रकारच्या सक्तीखाली प्रत्येक वाहनचालक भरडला जातो असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. हेल्मेटसक्ती गरजेची ठरते. त्यापाठोपाठ पर्यावरणाच्या नावाखाली पीयुसी सर्टिफिकेट सक्तीचे केले जाते. गाडीला योग्य दिवा हवा, आरसा हवा. गाडीचा विमा हवा. अशा एक ना अनेक सक्तीच्या कागदपत्रांचे भेंडोळे घेऊन वाहनचालकाला वावरावे लागते. आता या नंबर प्लेटचीदेखील अशाच प्रकारची सक्ती केली जाते आहे. सार्वजनिक परिवहन व्यवस्था भक्कम असेल तर वाहन संख्याही कमी होऊ शकते. परंतु सरकारला आपली जबाबदारी नीट पार पाडायची नाही. शिवाय गरजेपोटी वाहन वापरणाऱ्यांना मात्र सक्तीच्या वरवंट्याखाली भरडत ठेवायचे असा प्रकार सुरू आहे.